महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक १४४२(२)(२)/२०१९/२३** **दिनांक १९ नोव्हेंबर, २०२१**

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- <u>महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा-२०१९(पोलीस उपनिरीक्षक)</u> पुणे केंद्रावरील दिनांक २२ ते २५ नोव्हेंबर, २०२१ या कालावधीतील शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम पुढे ढकलण्याबाबत.**

**संदर्भ:- (१) जाहिरात क्रमांक ०१/२०१९ व अधिसूचना क्र. ०८/२०१९.**
**(२) आयोगाचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.**
**(३) आयोगाचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०१९-(पोलीस उपनिरीक्षक) च्या लेखी परीक्षेच्या दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या सुधारित निकालाच्या आधारे शारीरिक चाचणीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचा प्रथम टप्प्यातील कोल्हापूर, पुणे व नाशिक या केंद्रावरील शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम संदर्भित दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आला आहे. तथापि, पुणे केंद्रावरील दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ या कालावधीतील शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात येत आहे. तसेच प्रस्तुत केंद्रावरील दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ रोजीचा अपिलाचा कार्यक्रमही पुढे ढकलण्यात येत आहे. सदर कालावधीतील उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा तसेच अपिलाचा सुधारित कार्यक्रम स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

२. प्रस्तुत केंद्रावरील उर्वरित २९ नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक ०२ डिसेंबर, २०२१ व दिनांक ०६ ते ०९ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या कार्यक्रमात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**सचिव,**
**ठिकाण- मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**